# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१४-१५

## प्रसिद्धीपत्रक

दिनांक ११.७.२०१४

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कॉलेज मध्ये इ.११ वी ऑनलाईन पध्दतीने प्रवेश करण्याची प्रक्रिया दिनांक १४ जुलै २०१४ रोजी संपत आहे. यानंतरही ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळालेले नाहीत त्या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया संबंधित कॉलेज स्तरावर गुणवत्तेप्रमाणे होणार आहेत. यामध्ये-

१. ज्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश अर्ज भरता आला नाही किंवा आलेल्या अर्ज **Confirm** करता आला नाही.

२. प्रवेश प्रक्रीया चालू असताना बाहेरुन बदलून आलेले व ऑनलाईन प्रवेश अर्ज भरु न शकलेले विद्यार्थी.

३. ज्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरला परंतू विहित मुदतीत प्रवेश घेतला नाही असे विद्यार्थी.

४. ए. टी. के. टी. चे विद्यार्थी.

वरील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यासाठी खालील सूचनांचा अवलंब करावा.

१. दिनांक १५/७/२०१४ रोजी सकाळी १०.०० वाजता वेबसाईटवर **http://pune.fyjc.org.in** अथवा झोन सेंटरमधील प्रमूख केंद्रावर किंवा संबंधित शाळा/कॉलेजमध्ये शाखानिहाय/संवर्गनिहाय कॉलेज कटऑफ व रिक्त जागा पहावेत.

२. विद्यार्थ्यांनी आपले मार्कस्, कॉलेजचे कटऑफ (शेवटच्या विद्यार्थ्यांचे गुण व संबंधित कॉलेजमधील रिक्त जागा) याचा विचार करुन कॉलेजमध्ये लेखी स्वरुपात अर्ज करावा व त्याची पोहोच घ्यावी.

३. अर्ज करताना मूळ कागदपत्रे दाखविण्यात यावीत. मूळ कागदपत्रे असल्याशिवाय अर्ज घेतला जाणार नाही.

४. अर्ज घेणे, गुणवत्ता यादी पाहणे व गुणवत्ता यादीप्रमाणे प्रवेश देणे ही प्रक्रिया खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे राहील. सदरचे वेळापत्रक पाहून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

५. विद्यार्थ्यांना काही शंका असल्यास कॉलेज कटऑफ किंवा रिक्त जागांची माहिती आवश्यक असल्यास शहरामध्ये नऊ झोन सेंटरमधील प्रमूख केंद्र मार्गदर्शनासाठी ठेवण्यात आले आहेत. तेथे जावून माहिती घ्यावी.

# वेळापत्रक

| अ.क्रं. | दिनांक | वेळ | प्रवेश प्रक्रियेबाबत तपशील |
|---|---|---|---|
| १ | दि. १५, १६ व १७ जूलै २०१४ | स. ११.०० ते ५.०० | कनिष्ठ महाविद्यालय प्रवेश अर्ज स्विकारणे |
| २ | दिनांक १८ व १९ जूलै २०१४ | ---- | प्राप्त प्रवेश अर्जानुसार गुणवत्ता यादी करणे. |
| ३ | दिनांक २१ जूलै २०१४ | स. ११.०० | गुणवत्ता यादी जाहीर करणे |
| ४ | दि. २२, २३, २४ जूलै २०१४ | स. ११.०० ते ५.०० | गुणवत्तायादीनुसार रिक्त राहीलेल्या जागांवर प्रवेश देऊन प्रवेशाचे काम पूर्ण करणे |

## झोन निहाय समुपदेशन (मार्गदर्शन) केंद्रे.

| झोन क्रमांक | झोनचे नांव | समूपदेशन केंद्राचे नांव |
|---|---|---|
| 1 | पुणे शहर | स. प. महाविद्यालय, सदाशिव पेठ, पुणे ३० |
| 2 | कर्वेनगर /कोथरुड | आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे |
| 3 | पर्वती/धनकवडी/स्वारगेट | श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पर्वती ,पुणे |
| 4 | सिंहगड रोड | यशवंतराव मोहिते महाविद्यालय, एरंडवणा, पुणे |
| 5 | कॅम्प / येरवडा | पूना कॉलेज, कॅम्प, पुणे १ |
| 6 | हडपसर | आकुताई कल्याणी साधना विद्यालय व क.म.वि, हडपसर, पुणे |
| 7 | शिवाजीनगर/औंध/पाषाण | फर्ग्यूसन महाविद्यालय, पुणे |
| 8 | पिंपरी - भोसरी | जयहिंद हायस्कूल, पिंपरी, पुणे |
| 9 | चिंचवड – निगडी | श्री म्हाळसाकांत विद्यालय व क.म.वि. आकूर्डी, पुणे |

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १